http://www.sgbauonline.com/



# B.A. (Part–II) Examination
# (Modern Indian Language)
# MARATHI COMPULSORY

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 70

1. 'स्त्री-पुरुष तुलना' या वैचारिक पाठातून ताराबाई शिंदे यांनी पुरुषप्रधान मानसिकतेवर कसो प्रहार केला आहे याचा सविस्तर परामर्श घ्या.

**किंवा**

'डॉ. पंजाबराव : एक जमाखर्च' या वैचारिक पाठाद्वारे जनसामान्यांमध्ये एकरूप झालेल्या डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या विलोभनीय व्यक्तिमत्वाचे विविध पैलू सविस्तर स्पष्ट करा. 12

2. 'अखेरचे कीर्तन' या पाठातून संत गाडगे बाबांनी समाजातील अनिष्ट चालीरीती आणि दुष्ट प्रवृत्तींवर कसा शाब्दिक आघात केला ते थोडक्यात लिहा.

**किंवा**

'बुद्धीचा महिमा' या पाठाच्याआधारे 'धर्म' आणि 'युगधर्म' यांचे स्वरूप थोडक्यात स्पष्ट करा. 8

3. 'पंगू' या व. पु. काळे यांच्या कथेचे कथानक लिहून या कथेचे तात्पर्य सविस्तर स्पष्ट करा.

**किंवा**

'मातीचे धन' या नामदेव कांबळे यांच्या कथेच्या आधारे 'परसराम' आणि 'सरू' यांचे व्यक्तिचित्र सविस्तर स्पष्ट करा. 12

4. पेरणीच्या सरत्या हंगामाच्या दिवसातील 'खेडी आणि निसर्ग' यांचे ना. धों. महानोरांनी केलेले वर्णन संक्षिप्त स्वरूपात लिहा.

**किंवा**

'एका साध्या सत्यासाठी' या चंद्रकांत वानखडे यांच्या ललित पाठाचा सारांश थोडक्यात लिहा. 8

5. 'या करू निर्धार सारे....' या कवी ज्ञानेश वाकुडकर यांच्या प्रार्थनेतून मानवी जीवन सुखी व सुंदर करण्याचा निर्धार कसा व्यक्तहोतो ते विशद करा.

**किंवा**

'जखमा अजून ओल्या.....' या कवितेतून सिद्धार्थ भगत यांनी प्रखर वास्तवाची जाणीव करून देताना दुर्दम्य आशावाद कसा अभिव्यक्त केला आहे, ते सविस्तर लिहा. 12

6. पारमार्थिक जीवनातील आनंद प्रापंचिक जीवनात मिळू शकत नाही, असा भाव संत एकनाथाच्या 'दादला' या भारूडातून कसा व्यक्त झाला आहे, ते थोडक्यात विशद करा.

**किंवा**

हे अंतरात्म्या !' या तुळशीराम काजे यांच्या कवितेचे आशयसौंदर्य थोडक्यात लिहा. 8



http://www.sgbauonline.com/

http://www.sgbauonline.com/

7. खालील 'अ' आणि 'ब' मधील पत्राचे नमुने तयार करा :

(अ) शिवाजी महाविद्यालय, नाशिक येथे शारीरिक शिक्षण विभागासाठी व्हॉलीबॉल, फुटबॉल, क्रिकेट कीट या क्रीडा साहित्याची मागणी करणारे पत्र अभिनव क्रीडा साहित्य केंद्र, मुंबई यांना प्रा. कु. व्यंजना गायकवाड या नावाने लिहा.

किंवा

विद्याभारती महाविद्यालय, अमरावती या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना पथकात स्वयंसेवक म्हणून प्रवेश मिळावा म्हणून रासेयो. कार्यक्रम अधिकारी प्रा. रंजन बरोळे यांना विनंती करणारे पत्र रविराज जयकर या नावाने लिहा. 5

(ब) डॉ. अभय बंग यांना 'महाराष्ट्र भूषण' हा पुरस्कार मिळाल्याबद्दल श्री. अमर भुजबळ या नावाने अभिनंदनपर पत्र लिहा.

किंवा

विप्लव सोळंके चिखली, जि.बुलडाणा या महाविद्यालयीन विद्यार्थ्याने झी मराठीच्या 'सा रे ग म पा' चे महाविजेते पद पटकावले, त्याबद्दल कु. सुनिधी मोरे, नावाने शुभेच्छा पत्र लिहा. 5



http://www.sgbauonline.com/